मत्स्यव्यवसाय विभागातील गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांची त्यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षानंतर, सेवा पुनर्विलोकन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मत्स्यआ-२०२६/प्र.क्र.७६/पदुम-१२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ जुलै, २०२६

वाचा : १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एलपीएल-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा, दिनांक १०/०६/२०१९.

२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक मत्स्यआ-२०२०/प्र.क्र.१३२/पदुम-१२, दिनांक १२/११/२०२०.

३) विभागीय पुनर्विलोकन समितीची बैठक, दिनांक ७/०७/२०२६.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम १० (४) व नियम ६५ अनुसार सार्वजनिक हितास्तव अकार्यक्षम व संशयास्पद सचोटीच्या अधिकारी/कर्मचारी यांना वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर, यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा, सेवेत राहण्याची पात्रापात्रता (पात्र/अपात्र) आजमाविण्याच्या दृष्टीने त्यांच्या सेवेचे पुनर्विलोकन करुन सुयोग्य व कार्यक्षम अधिकारी / कर्मचारी यांना शासन सेवेत पुढे चालू ठेवावे व अकार्यक्षम तसेच संशयास्पद सचोटी असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना शासन सेवेतून मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे असे शासनाचे धोरण आहे. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्रमांक १ येथील दि.१०/०६/२०१९ च्या शासननिर्णयान्वये सेवापुनर्विलोकनासंबंधी कार्यपध्दती व सर्वसाधारण सूचना विहीत केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन, मत्स्यव्यवसाय विभागातील गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवापुनर्विलोकनाकरीता संदर्भ क्र.२ येथील दिनांक १२/११/२०२० च्या शासन निर्णयान्वये सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

मत्स्यव्यवसाय विभागातील गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर, यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी त्यांच्या सेवा पुनर्विलोकन करण्यासाठीचा विहीत प्रस्ताव मा.सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय पुनर्विलोकन समितीच्या दिनांक ७/०७/२०२६ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. विभागीय पुनर्विलोकन समितीने सदर अधिकाऱ्यांच्या सेवेचे मुल्यमापन करुन केलेल्या शिफारशीनुसार ज्या

अधिकाऱ्यांना वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी सेवेत राहण्यासाठी पात्र ठरविले आहे त्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

विभागीय पुनर्विलोकन समितीच्या दिनांक ७/०७/२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील शिफारशीस अनुसरुन मत्स्यव्यवसाय विभागातील गट-अ संवर्गातील सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची सेवा त्यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर, यापैकी जे अगोदर घडेल त्यानंतर चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सोबत जोडलेल्या प्रपत्रामधील गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवा ५०/५५ व्या वर्षानंतर किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुढे चालू ठेवण्यास मान्यता मिळाल्याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२७१६२२३९५४४५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAKHATE KISHOR MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.07.27 16:23:30 +05'30'

(कि.म.जकाते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. उपआयुक्त मत्स्यव्यवसाय (प्रशासन), आयुक्त मत्स्यव्यवसाय, मत्स्यव्यवसाय कार्यालय, मुंबई.
३. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई/नागपूर.
५. संबंधित अधिकारी
६. निवडनस्ती पदुम-१२.

मत्स्यव्यवसाय विभागातील गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांची त्यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षानंतर किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर सेवा पुढे चालू ठेवण्यास पात्र ठरलेल्या अधिकाऱ्यांची यादी.

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	पदनाम
१.	श्री.महेश हि. देवरे	सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (सागरी)
२.	श्री.सु. ओ. भोंबे	सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (प्रशासन)

JAKHATE KISHOR
MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department,
2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.07.27 16:23:45 +05'30'

(कि.म.जकाते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन